# वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती एच नवघर माणिकपूर विभाग

ता. वसई, जि. पालघर

जा. क्र. ५८५५/२०२०

दि. १४/०३/२०२०

## जाहिर दरपत्रक

सर्व पेपर सप्लायर्स यांच्या माहितीसाठी कळविण्यात येते कि, वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "एच" नवघर माणिकपूर येथील डॉ. के. ब. हेडगेवार सार्व. वाचनालयासाठी वित्तीय वर्ष २०२०-२१ या वर्षाकरीता लागणारी वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके, पाक्षिके तसेच दिवाळी अंक पुरविणेकामी वार्षिक दरपत्रके मागविण्यांत येत आहेत. सदरची दरपत्रके दि. २४/०३/२०२० रोजी दु.१२.०० वाजेपर्यंत प्रभाग समिती "एच", नवघर माणिकपूर येथील आवक जावक विभागात सादर करावीत.

| अ. क्र. | कामाचे नाव | परिमाण | वृत्तपत्रे (सवलतीची टक्केवारी) | साप्ताहिके (सवलतीची टक्केवारी) | मासिके (सवलतीची टक्केवारी) | पाक्षिके (सवलतीची टक्केवारी) | दिवाळी अंक (सवलतीची टक्केवारी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | सा २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरीता सार्व. वाचनालयासाठी वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके, पाक्षिके व दिवाळी अंक पुरविणेबाबत. | प्रती नग | | | | | |

## अटी व शर्ती

१) दरपत्रकधारकांनी स्वतःचे लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे. दरपत्रकावर GST क्रमांक असणे बंधाकारक राहिल.

२) मालकाचे / संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावे.

३) दरपत्रक मंजूर झाल्यानंतर दरपत्रकधारकांनी १५ दिवसांत कार्यालयात उपस्थित राहून करारनामा करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

४) दरपत्रकात नमूद वस्तूंचे/साहित्यांचे दर सादर करताना मूळ किंमत, वाहतूक खर्च व इतर सर्व करासहीत टक्केवारीत नमूद करावेत.

५) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवलेला आहे.

६) वरील अटींचे पालन जे दरपत्रकधारक करणार नाहीत. त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात येतील.

७) वरील कामाची दरपत्रके सिलबंद लिफाफ्यात दि.२४/०३/२०२० रोजी दुपारी १२.०० वाजता प्रभाग समिती एच नवघर माणिकपूर येथील आवक जावक विभागात सादर करावीत.

८) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रक दि.२४/०३/२०२० रोजी दु. ३.०० वाजता मा. सहा. आयुक्त यांचे दालनात उपस्थित दरपत्रकधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी व दरपत्रक निवड समिती हयांचे समक्ष उघडण्यांत येईल.

ठिकाण :- प्रभाग समिती "एच"नवघर माणिकपूर विभाग
वसई-विरार शहर महानगरपालिका

सहा.आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका

Scanned with CamScanner